# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/05/2023 (मंगळवार) सकाळ


---

## पो.स्टे. कळमेश्वर येथील क्रिकेट सट्टयावर धाड
## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीणची कारवाई :—

दिनांक ३०/०५/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नागपूर ग्रामीण हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीत वार्ड नं. ४ येथे काही इसम हे एका घरात IPL क्रिकेट मॅच मधील गुजरात टायटन विरूद्ध चेन्नई सुपर किंग्स यांचे मध्ये खेळल्या गेलेल्या क्रिकेट सामन्यावर बेटिंग (सट्टा) लावुन जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पथकास प्राप्त झाले वरून सदर पथकाने कळमेश्वर हद्दीत वार्ड नं. ०४ येथे सापळा रचुन छापा टाकुन आरोपी नामे— **१) अमोल प्रेमराज उके, वय ३५ वर्ष, रा. वार्ड क्र. ४ कळमेश्वर जिल्हा नागपूर २) कैलास उर्फ पिंटू साहेबराव कोहिटे, वय २५ वर्ष, रा. वार्ड क्रमांक १४ कळमेश्वर जिल्हा नागपूर ३) रवी खडसे, रा. कळमेश्वर जिल्हा नागपूर** हे लोकांकडुन पैसे घेवुन IPL क्रिकेट मॅच मधील गुजरात टायटन विरूद्ध चेन्नई सुपर किंग्स यांचे मध्ये खेळल्या गेलेल्या क्रिकेट सामन्यावर बेटिंग (सट्टा) लावुन जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०३ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन १) ५ मोबाईल संच किमती ५१,०००/— रुपये २) नगदी २०००/— रुपये ३) इतर दस्तऐवज असा एकूण ५३,२०५/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे कळमेश्वर येथे गुन्हा नोंदवुन आरोपींतांना जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे कळमेश्वर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांच्या मार्गदर्शनाखाली परी. सहायक पोलीस अधिक्षक श्री. अनिल म्हस्के, परी. पोलीस अधीक्षक श्री. राहुल झालटे, पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, सहायक फौजदार चंद्रशेखर गडेकर, पोलीस हवालदार राजेंद्र रेवतकर, दिनेश आधापुरे, पोलीस नायक किशोर वानखेडे, उमेश फुलबेल यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर